


# १०वी वेध व्यवसाय प्रबोधन परिषद

औरंगाबाद, ८ जानेवारी २०१७

## आयोजक

टेंडर केअर होम, औरंगाबाद.

इन्स्टिट्यूट फॉर सायकॉलॉजीकल हेल्थ, ठाणे.

http:/www.vedhiph.com

http:/www.facebook.com/iphorg



**डॉ. आनंद नाडकर्णी**
मानसोपचारतज्ज्ञ



**विंग कमांडर यु.डी. केकरे**
अध्यक्ष



**श्रीमती शैलजा केकरे**
मार्गदर्शक संचालक



**श्रीमती शितल केकरे**
प्रचार्या

"School with a difference" हे आपण पाहीलेले स्वप्न आयुष्यात सत्यात उतरवलेले दांपत्य विंग कमांडर उल्हास केकरे व सौ. शैलजा केकरे यांनी Tender Care Home या शाळेच्या माध्यमातून औरंगाबादच्या स्पर्धात्मक युगात असणाऱ्या मुलांना, त्यांच्या पालकांना तसेच शिक्षकांना दिलेली एक अनमोल भेट म्हणजे ''वेध''.

प्रख्यात मानसोपचारतज्ज्ञ डॉ. आनंद नाडकर्णी हे व्यवसायाने जरी डॉक्टर असले तरी ते एक अष्टपैलू व्यक्तीमत्व आहे. गोल्ड मेडलिस्ट डॉक्टर, १६ पुरस्कार विजेत्या पुस्तकांचे लेखक, इयत्ता ९वीच्या ''कुमारभारती'' ह्या पाठ्यपुस्तकातील धड्याचे लेखक, असंख्य एकांकिका, तसेच यशस्वी व्यावसायिक नाटकांचे लेखक, 'देवराई' सिनेमाचे सल्लागार, 'नव्या शतकाचे गाणे : The Song of Life' या गीतसंग्रहाचे लेखक व संगीतकार आणि 'सुदृढ मन सर्वांसाठी' या भावनेतून १९९०साली सुरू झालेल्या IPH (Institute for Psychological Health) या संस्थेचे व्यवस्थापकीय विश्वस्त. अशा या ध्येयवेड्या डॉक्टरांनी उमलत्या तरूणाईसाठी दिलेले अविचल ध्येय म्हणजेच ''वेध''.

ज्याच्या आयुष्यावर 'थ्री इडीयट्स' हा चित्रपट निर्माण झाला तो सोनम वांगचुक, अनिल अवचट या सारखा छंद हेच जीवन मानणारा मनस्वी ते पक्षीमित्र किरण पुरंदरे; हस्तलेखन शैलीतले दिग्गज अच्युत पालव; अच्युत गोडबोले, डॉ. आनंद देशपांडे, दिपक घैसास, विवेक सावंत, कृष्णकांत माने सारखे संगणक क्षेत्रातील दिग्गज; भूषण गगराणी, मनीषा म्हैसकर, निरुपमा डांगे, सुनील केंद्रेकर सारखे प्रशासकिय अधिकारी; विश्वास नांगरे-पाटील, इशु सिंधु, सुनिता ठाकरे सारखे पोलिस दलातील कर्तव्यदक्ष अधिकारी; नितीन नित्सुरे, कल्पना जोशी, रोहन शेट्टी, मानसी करंदीकर व केतकी घाटे, बाळासाहेब दराडे सारखे विविध क्षेत्रात काम करणारे शास्त्रज्ञ; रजनी दांडेकर, मोहिनी केळकर, अश्विनी देशपांडे, सुनील रायठठ्ठा सारखे यशस्वी उद्योजक; हॉटेल व्यवसायिक विठ्ठल कामत ते शेफ देवव्रत जातेगांवकर; गिरीश कुबेर व अतुल देऊळगांवकर सारखे निर्भिड पत्रकार; चंद्रशेखर भडसावळे, के. मुरलीधरन सारखे प्रगतिशील शेतकरी; कारुण्यासारखी तरुण कमर्शियल पायलट, औरंगाबादची कन्या Sqn.Ldr. अरुंधती कुरतडीकर; चंद्रकांत कुलकर्णी, अमृता सुभाष, अतुल कुलकर्णी, विभावरी देशपांडे, नंदु माधव, वैशाली सामंत, मृण्मयी देशपांडे या सारखे नाट्य व सिनेक्षेत्रातील सृजनशील कलावंत अशा विविध क्षेत्रातील दिग्गज एका व्यासपीठावर आणून त्यांचा मुलांशी संवाद घडविण्याचे काम करते ''वेध''.

याच बरोबर संतोष गर्जे, संध्या व दत्ता बारगजे, कावेरी व दिपक नागरगोजे, मतीन भोसले या सारख्या समाजातील दुर्लक्षित घटकांच्या उन्नतीसाठी झोकून दिलेल्या ध्येयवेड्यांचा गौरव करत त्यांच्या कार्याची विद्यार्थ्यांना ओळख करुन देण्याचा देखील ''वेध'' द्वारे प्रयास केला जात आहे.

# औरंगाबाद वेध २०१७ साठी आमंत्रित ''आयकॉन्स''



## शेख रफीक

e-mail: shaikhrafuq591@gmail.com

### महाराष्ट्र पोलीस दलालील पहीला 'एव्हरेस्टवीर'

शिक्षण घेत असताना NCC च्या ट्रेकींग कॅम्पमुळे रफिकला गिर्यारोहणाचा छंद जडला. पुढे WHMI, मनाली येथून बेसिक कोर्स तर HMI, दार्जिलींग येथून ॲडव्हान्स कोर्स 'A' ग्रेडने पूर्ण केला.

दरम्यान त्याने हिमालयातील असेख्य अतीउंच शिखरे पादाक्रांत केली पण प्रत्येक गिर्यारोहकाचे स्वप्न असलेले एरहरेस्ट त्याला साद घालत होते. पहील्या दोन मोहीमा लागोपाठच्या वर्षी झालेले हिमस्खलन व नेपाळमधील भुकंपामुळे रफिकला अर्धवट सोडाव्या लागल्या. या अपयशांमुळे खचून न जाता रफिकने आपल्या तिसऱ्या मोहीमेत दि. १९ मे २०१६ रोजी अत्युच्च अशा **'माउंट एरहरेस्ट'** वर तिरंगा फडकवला.



## मुक्तक जोशी

e-mail: msjoshi@ebay.com

### C.T.O. & M.D. Ticket Utils Inc, New Jersey.

MIT औरंगाबाद येथे B.E. करत असतांनाच मुक्तकने आपली पहिली सॉफ्टवेअर कंपनी सुरु केली. त्यानंतर New Jersey, USA येथे Ticket Utils Inc, स्थापन करुन औरंगाबादेतील तिची Subsidiary सुरु केली. उच्च दर्जाच्या ई-सर्व्हीस देण्याऱ्या ह्या कंपनीशी **e-bay** या जगद्‌विख्यात कंपनीने व्यावसायीक सहभाग घेतला आहे.

पुरस्कार : मराठवाड्यातील सर्वात तरुण Microsoft Certified Solution Developer
IIT, पवई येथील National Level Open Software स्पर्धेत बक्षीस मिळवणारा
MIT औरंगाबादचा पहिला विद्यार्थी.



## डॉ. राजेंद्र भारुड IAS

e-mail: rajendra.bharud@gmail.com

### धुळे जिल्ह्यातील भिल्ल समाजाचे पहिले डॉक्टर व IAS अधिकारी

जन्मापुर्वीच वडीलांचे छत्र हरपलेले असुनही राजेंद्र परंपरागत गरीबी व अज्ञानावर मात करण्याच्या त्यांच्या आई व मावशीच्या आग्रहामुळे शाळेत गेले. आपल्या अंगभूत हुशारीमुळे अभ्यासाची गोडी लागुन राजेंद्र उत्तरोत्तर प्रगती करु लागला. दहावी-बारावीला मेरीटमध्ये आलेल्या राजेंद्रने पदवीसाठी मेडीकलला जाण्याचे ठरवत जी.एस. मेडीकल कॉलेज, मुंबई येथे ॲडमिशन घेतली. तेथेही 'बेस्ट स्टुडंट ॲवार्ड' मिळवले. आपल्या ज्ञानाचा समाजातील अधिकाधीक लोकांना उपयोग करवून देण्याच्या उद्देशाने पुढे प्रशासकीय सेवेचे क्षेत्र निवडले. त्यातही यश मिळवत २०१२ मध्ये IAS झाले. सद्या ते किनवट येथे असिस्टंट कलेक्टर म्हणून तेथील स्थानिक समस्यांवर मात करण्यासाठी कार्यरत आहेत.

# औरंगाबाद वेध २०१७ साठी आमंत्रित "आयकॉन्स"



## चंद्रकांत कुलकर्णी

e-mail: chandukul@gmail.com

**आघाडीचे मराठी नाट्य व सिने लेखक, दिग्दर्शक व निर्माते**

औरंगाबादच्या नाट्यशास्त्र विभागातून Bachlar of Dramatics या पदवी परीक्षेत विद्यापीठात सर्वप्रथम आलेला प्रतिभावंत. विविधांगी आशय-विषयांवर प्रयोगशीलता जोपासत मराठी नाट्य, चित्रपट व टीव्ही या तीनही माध्यमाद्वारे जनमानसात लोकप्रिय ठरलेल्या असंख्य कलाकृती सादर केल्यात.

**चित्रपट :** बिनधास्त, भेट, काय द्यांचं बोला, तुकाराम इ.

**नाटके :** डॉक्टर तुम्हीसुध्दा, चारचौघी, वाडा चिरेबंदी, गांधी विरुध्द गांधी, हॅम्लेट, शाकुंतल, बटाट्याची चाळ, गेट वेल सून इ.

**मालिका :** व्यक्ती आणि वल्ली, पिंपळपान, टिकल ते पॉलिटीकल इ.

**पुरस्कार :** सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक - राष्ट्रीय पारितोषीक, महाराष्ट्र शासन, फिल्मफेअर, स्क्रीन, झी गौरव, अल्फा गौरव, नाट्यदर्पण, नाट्यपरिषदेचे सर्वोत्तम दिग्दर्शक, मराठवाडा भूषण व इतर असंख्य पुरस्कार.



## पूर्वा निलीमा सुभाष

e-mail: purvans@gmail.com

**''जय मल्हार'' या लोकप्रिय मालिकेतील 'देवी लक्ष्मी'**

प्राध्यापिका आई व सामाजिक कार्यकर्त्या वडीलांच्या ह्या कन्येने B.E. (E&TC) पर्यंतचे शिक्षण औरंगाबादेत करत असतानाच आपल्या कलागुणांची चुणूक दाखविली होती. शिक्षण पूर्ण केल्यावर मात्र तिने अभिनयात करियर करण्याचे ठरवून मुंबई गाठली व अल्पावधीतच अभिनय कारकिर्दीस सुरुवात केली.

**नाटक :** इंदिरा

**चित्रपट :** सूत्रधार



## देविका वैद्य

e-mail: devikapv52@gmail.com

**भारतीय महिला T-20 व ODI क्रिकेट संघातील अष्टपैलू खेळाडू.**

अवघ्या १२व्या वर्षी महाराष्ट्राच्या १९वर्षाखालील संघात व १३व्या वर्षी सिनीयर संघात स्थान मिळविलेल्या देविकाने देशांतर्गत खेळल्या जाणाऱ्या स्पर्धेमध्ये केलेल्या दमदार अष्टपैलु खेळाने निवड समितीचे लक्ष वेधून घेत वयाच्या सतराव्या वर्षी भारतीय संघात स्थान मिळविले. पदार्पणाच्या द. आफ्रिकेविरुध्दच्या T-20 सामन्यात चमकदार कामगिरी केली. सध्या ती भारतीय महिला ODI संघातून खेळत असून पूढील वाटचालीस सिध्द आहे

# औरंगाबाद वेध सन्मान - २०१७



## अधिक कदम

**संस्थापक, बॉर्डरलेस वर्ल्ड फाउंडेशन**

१९९७ मध्ये पॉलिटीकल सायन्सचा प्रथम वर्षाचा विद्यार्थी असलेला 'अधिक' विस्थापित काश्मिरी पंडीत या विषयीच्या १५ दिवसांच्या अभ्यास दौऱ्यावर जम्मू-काश्मिरला गेला. तेथील सततच्या हिंसाचारात बळी पडलेल्या अतिरेकी तसेच सामान्य माणसांच्या अनाथ मुलांची, विशेषत: मुलींची भयावह स्थिती पाहून अंतर्बाह्य ढवळुन निघाला. त्याविषयी पूर्ण सत्य जाणुन घेण्याच्या उद्देशाने पूढील पाच वर्षे वर्षातील दहा महिने काश्मिरमध्येच राहून अंतर्गत व सिमावर्ती भागात फिरून माहिती घेत गेला.

एका निर्णायक क्षणी अधिकने आपले आयुष्य या अनाथ मुलींच्या कल्याणासाठी झोकून देण्याचे ठरवत सन २००२ मध्ये अवघ्या चार मुलींना घेऊन पहिले आधारगृह **'बसेरा-ए-तबस्सुम'** स्थापन केले. या दरम्यान मौलवींचे त्याच्यावरील बहिष्काराचे फतवे, अतिरेक्यांकडून अपहरण व अमानुष मारहाण आणि इतर असंख्य संकटांवर मात करत स्थानिक रहिवाशांचे सहकार्य व सेवाभावी सहकाऱ्यांच्या मदतीने त्याने आपले कार्य नेटाने सुरु ठेवले वाढविले आहे. आज त्यांची जम्मू व काश्मिरमध्ये ५ आधारगृहे असून १८ महिने ते २० वर्षापर्यंत वयाच्या दोनशेहून अधिक मुलींचा बाप-भाऊ बनत अधिक त्यांना मायेची ऊब देत पुढील आयुष्य स्वयंपूर्णतेने जगण्यासाठी तयार करत आहे.

अधिकच्या या कार्याला सलाम म्हणून व त्यांच्या पूढील वाटचालीस बळ यावे म्हणून त्यांना या वर्षीचा पाचवा **'वेध सन्मान'** देवून गौरविण्यात येत आहे.

औरंगाबाद २०१७

# वेध गीते

## गीत १. लोकल ते ग्लोबल

इवलं इवलं रोप, लई उंच वाढलंय् मोप ।।धृ।।
रोपाचे झाले झाड, फांदीला फुटे डहाळी
पानांनी सजली काया, ती राजस नवी नव्हाळी
हिरव्या गर्दीतून डोकावत, मस्त फुलांच्या रांगा
फुलगुच्छांच्या टोकावर, रसदार फळांच्या जागा।।१।।
सातसमुद्रापल्याडहून विहरत, आला पक्षी प्रवासी
झाडाच्या शेंड्यावर बसुनी, गपशप करतो खासी
येशील का त्या नव्या जगातच, सोडून इथली जागा
तिथेच होईल मोल तुझे, किंमत मग कितीही मागा।।२।।
झाड म्हणे मी उंच वाढलो, इथल्या मातीवरती
इथले पाणी, प्रकाश इथला, खोल मुळांची नाती
फळाफुलांचे वैभव माझे, इथे बालके खाती
सावलीतला थंड विसावा, सानथोरही घेती।।३।।
पराग-केसर देतो तुजला, परदेशात वहाया
रुजतील तेथे आणि डवरतील, देतील फळ अन् छाया
होतील तिथले, तरी न विसरतील ह्या मातीची माया
सत्त्वच माझे मी पाठवले, सर्व जगाला द्याया।।४।।
इवलं इवलं रोप, लई उंच वाढलंय् मोप

गीतकार व संगीतकार : डॉ. आनंद नाडकर्णी

## गीत २. नित्यनवे वर्ष

नित्यनवे वर्ष, स्वागत आनंदानी
सुखाचा स्पर्श-हर्ष या जीवनी ।।धृ।।
हवेतला गारवा, नात्यामधला गोडवा
मनामनात घुमतो स्वप्नीचा पारवा
ध्येयाप्रती ध्यास, विश्वासाचा वास
मोहक पदन्यास प्रत्येक प्रांगणी ।।१।।
सृष्टीचे सृजन, ताल पावसाचा
फुले आणी पाखरे, महोत्सव रंगाचा
संगीताचे श्रवण, कथाकाव्य गायन
स्नेहाचे चांदणे उजळते अंगणी ।।२।।
कधी चिंतातूर मन हो आतूर
दुःखाचे सागर आसवाची धार
पण होते पहाट धुक्यातली वाट
आशेची खुणगाठ उमलून येते मनी ।।३।।
आयुष्याचे आकाश भक्तीचा प्रकाश
क्षणक्षण तृप्तीने जगू सावकाश
निसर्गात रमुनी सारे एक होवूनी
जीवन उत्सवात जाऊ या रंगुनी ।।

गीतकार - सौ. अनुराधा पिंगळीकर
संगीतकार - विनायक पांडे - अजय गवळे

## गीत ३. पावलोपावली रुतले काटे

पावलोपावली रुतले काटे, तरी रस्त्याला कधी न सोडायचं
काळोखी नभात, अकेला तारा, त्याला पाहून पुढं रं चलायचं।।धृ।।
मनात उमले, इवलासा कोंब, त्याला वादळापासून जपायचं
प्रेमाचं पाणी आणि कष्टाचं खत त्याला, नेमाने रोजचं घालायचं।।१।।
एकाच्या हातात दुसऱ्याचा हात, घेऊन् उर्जेला एकत्र जोडायचं
कामाच्या गतीत, घामाच्या थेंबात, नृत्याचं लावण्य शोधायचं।।२।।
भरात आला आता स्वप्नाचा ध्यास, तर रातीला दिवस करायचं
ताणाच्या क्षणाला, थकल्या तनाला, सर्वांना आपलं म्हणायचं।।३।।
यशाच्या वेशीत गुढ्याकमानी, तरी बेडकीगत नाही रं फुगायचं
नजरेपल्याड आहे अजून् आकाश, त्याला कवेत घेऊन जगायचं।।४।।

गीतकार व संगीतकार
डॉ. आनंद नाडकर्णी

## गीत ४. कर्तव्याचे होई गाणे

कर्तव्याचे होई गाणे, तन्मयतेची तान।
परिश्रमाच्या वेलीवरचे यश सोनेरी पान।।धृ।।
अशी कल्पना मनात यावी, तिचाच व्हावा ध्यास
त्या ध्यासातून उमलत जाई, रोज नवा अभ्यास
अभ्यासातून उमगत जाई,
पूर्ण जगाचे भान ।।१।।

थकल्यावरही ध्येय ऊरीचे, रोज असावे जागे
पहाट होता, नव्या दमाने, मन मार्गाला लागे
मतीकृतीतील सरता अंतर,
योग साधतो छान।।२।।

पावलातली शक्ती माझ्या, ह्दयी उतरत जाई
मंत्र उद्याचा, हर श्वासाला, नवी उभारी देई
प्रवास झाला मधुर-निरामय,
उन्नत हो अभिमान।।३।।

कर्तृत्वाच्या शिखरावरही, नसती हेवे दावे,
यशातले आनंदज्ञान सर्वांचे होऊन जावे
नम्रतेतला सुगंध पसरे
हिरवे अवघे रान ।। ४।।

गीतकार व संगीतकार : डॉ. आनंद नाडकर्णी

## गीत ५. मी रोज स्वतःशी गावे

श्वासात मिसळुनी द्यावे
हे सूर नव्या हिमतीचे . . .
. . .are my friends
ITS IN ME, THE SONG OF LIFE
जलद जगाशी जुळवित अपुली
जगण्याची लय सारे
शोधून काढू अंतरातली
अवघी मिटली दारे
ध्यास स्वत:च्या उत्कर्षाचा
डोळस करता करता
मागे पडल्या, विसरवाटेच्या
भावांना उरि धरता
प्रगतीच्या या प्रवासातही
ह्रदयी अमृत ठेवू
वाटेवरती स्वच्छंदपणे
प्रेमच उधळत जाऊ
या उर्जेचा हा उत्सव
घेऊन पहा हर अनुभव
हारजीत शिकवते आम्हा . . .
. . .How to thrive
ITS IN ME, THE SONG OF LIFE . . .

गीतकार व संगीतकार : डॉ. आनंद नाडकर्णी

## गीत ६. नील गगन हरीत धरा

नील गगन, हरीत धरा, शुभ्रतेत न्हात झरा
हिमशिखरी किरणांचा, लालकेशरी ग तुरा
चित्र मिळून सारे, रोज रेखू या
प्रगल्भ भारताचे निशाण होऊया.

केशरिया शक्ती देत, हिरवी ती निर्मिती,
समतेचा धवलरंग, चक्र असे नित्यगती
रंग जीवनाचे रंगून गाऊया
प्रगल्भ भारताचे निशाण होऊया.

ध्वज माझा स्फुर्तीदायी, ध्येयाप्रत नेई
कृष्णमेध जमले तरी धैर्य मला देई
प्रयत्न हेच रत्न, ओंजळीत ठेऊया
प्रगल्भ भारताचे निशाण होऊया.

उन्नतीचे आत्मगीत गातसे तिरंगा
भक्तीनेच ईशरुप, येतसे अभंगा
विश्वास उजळणारा, विश्वास देऊया
प्रगल्भ भारताचे निशाण होऊया.

गीतकार व संगीतकार : डॉ. आनंद नाडकर्णी




वेध औरंगाबाद संयोजक




वेध औरंगाबाद - टीम टेंडर केअर होम

With Best Compliments From...

# Aarti Book Depot

Aurangpura, Aurangabad.

With Best Compliments From...

# Ratna Sagar

Publications Pvt. Ltd.

# Supported by...

Bank of
Maharashtra

Crystal
Readymades

Aurangpura, Aurangabad.

McMillan
Publishers Ltd.

Manas
Voyagers
Pvt. Ltd.

# Supported by...

PANAT HOSPITAL

celebrating 25 years of care

12, Sushil Society, Shreya Nagar, Behind Pawan Gas, Usmanpura, Aurangabad - 431005.
Ph. No.: 0240-2353335 / 2359674 / E-mail: mangeshpanat@yahoo.co.in / Hospital Reg. No. 10

## With Best Wishes.....

# Cordova

## Education Solutions Pvt. Ltd.